LOKNETE DR.BALASAHEB VIKHE PATIL. (PADMA BHUSHAN AWARDEE)

PRAVARA RURAL EDUCATION SOCIETY'S

Establishment 4 August 2004



# ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, ALKUTI

ID.No. PU/AN/ACS/78/2004

College code No.757

A/p.Alkuti, Tal.Parner, Dist.Ahmednagar. Pin-414305

NAAC Accredited 'B++ 'Grade College (CGPA- 2.78)

- Phone: (02488) 250457

Email ID : Principal.acsalkuti@pravara.in

# AQAR:-2023-2024



## Criteria - 3 | Research, Innovations and Extension

### KEY INDICATOR : 3.2- Research Publication and Awards

**Metric: - 3.2.1-** Number of Paper published per teacher in the Journals notified on UGC Website during the year

**3.2.1.1 – Number of research papers in the Journals notified on UGC website during the year.**

# Index 2023-24

| Sr. No. | Title of paper | Name of the author/s | Name of journal | ISSN Number | Page No. |
|---|---|---|---|---|---|
| 1. | *Bhartiy Swatantry Ldhyatil Upekshit Virangana:Rani Zalkari* | Kavade K.B. | Journal of Research and Development | 2230-9578 | 3-8 |
| 2. | *Haidrabad Muktisangramat Mahilancha Sahbhag* | Rokade V.R | Ihitas Darpan | 0974-3065 | 9-17 |

Peer reviewed Journal    Impact Factor: 7.265    ISSN-2230-9578

# Journal of Research and Development




***A Multidisciplinary International Level Referred Journal***

***January-2024    Volume-16    Issue-1***





**Chief Editor**

***Dr. R. V. Bhole***

ज्ञान-विज्ञान विमुक्तये
UGC
University Grants Commission

**UGC Listed**
**Journal Listed No-64768**
Up to-May, 2019
(Now Peer Review)



**Publication Address**

**'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102**

# Journal of Research and Development

*A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal*

***January-2024 Volume-16 Issue-1***

## Chief Editor

Dr. R. V. Bhole
'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23,
Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102


| EDITORIAL BOARD | | |
|---|---|---|
| ***Nguyen Kim Anh*** *[Hanoi] Virtnam* | ***Prof. Andrew Cherepanow*** *Detroit, Michigan [USA]* | ***Prof. S. N. Bharambe*** *Jalgaon[M.S]* |
| ***Dr. R. K. Narkhede*** *Nanded [M.S]* | ***Prof. B. P. Mishra,*** *Aizawal [Mizoram]* | ***Prin. L. N. Varma*** *Raipur [C. G.]* |
| ***Dr. C. V. Rajeshwari*** *Pottikona [ AP]* | ***Prof. R. J. Varma*** *Bhavnagar [Guj]* | ***Dr. D. D. Sharma*** *Shimla [H.P.]* |
| ***Dr. AbhinandanNagraj*** *Benglore[Karanataka]* | ***Dr. VenuTrivedi*** *Indore[M.P.]* | ***Dr. ChitraRamanan*** *Navi ,Mumbai[M.S]* |
| ***Dr. S. T. Bhukan*** *Khiroda[M.S]* | ***Prin. A. S. KolheBhalod*** *[M.S]* | ***Prof.KaveriDabholkar*** *Bilaspur [C.G]* |


**Published by**-Chief Editor, Dr. R. V. Bhole, (Maharashtra)

**The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers. The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.**

**© All rights reserved with the Editors**

| | | |
|---|---|---|
| 24 | शिक्षा के क्षेत्र में पंचायती राज की भूमिका<br>डॉ. ईश्वर स्वरूप सहाय, प्रीति कुमारी | 89-91 |
| 25 | भारतीय स्वांतत्र्यलढ्यातील उपेक्षित विरंगणा : राणी झलकारी<br>**Dr. Kunda Balasaheb Kavade** | 92-93 |
| 26 | महिलांच्या आहार विषयक सवयीवर पोषण शिक्षणाचा प्रभाव<br>प्रा. नितु जिवनराव शेंडे | 94-96 |
| 27 | चिपळूणमधील बांधण मासेमारीचा चिकित्सक अभ्यास<br>डॉ .राहुल शां. पवार | 97-100 |
| 28 | अमरावती विभागातील सार्वजनिक आरोग्याची स्थिती<br>डॉ. प्रविण भास्करराव हाडे | 101-103 |
| 29 | मराठा साम्राज्य में पेशवा बालाजी विश्वनाथ का योगदान<br>प्रोफेसर चंपालाल पाटले, डॉ. कमलेश कुमार शुक्ल | 104-105 |
| 30 | একবিংশ শতাব্দীতে স্যানিটেশন প্রসঙ্গে মেয়েদের দৃষ্টিভঙ্গির পর্যালোচনা<br>গোলাপসা খাতুন, সাইফুল্লা সরদার | 106-112 |
| 31 | ભારતમાં કોમ્યુનીટી રેડયોિનો વકિાસ અને અસરો<br>ડૉ. હતિશ એન. જાગાણી | 113-119 |
| 32 | - 1969 ರ ಬ್ಯಾಂಕಗಳ ರಾಷ್ಟ್ರೀಕರಣ ಮತ್ತು ಕರ್ನಾಟಕದ ಮೇಲಾದ ಪರಿಣಾಮ<br>ಡಾ. ಪ್ರತಿಮಾ ಎಂ. ಬಿದರಿಮಠ | 120-123 |

'Journal of Research & Development'
A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, January-2024, Volume-16 Issue-1

# भारतीय स्वांतत्र्यलढ्यातील उपेक्षित विरंगणा : राणी झलकारी

**Dr. Kunda Balasaheb Kavade**
Department of Marathi, Arts Commerce and Science College Alkuti Tal. Parner. Dist. Ahmednagar
**Corresponding Author- Dr. Kunda Balasaheb Kavade**
**Email:** kavadekunda@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.10682545**

**प्रस्तावना:**

ज्या -ज्यावेळी भारतावर परकीय अक्रमणे झाली त्या-त्यावेळी आदिवासी जमातीनी त्यांना अत्यंत प्रखरपणे विरोध केला. आदिवासी स्त्री पुरुषांचे योगदान खुप मोठे आहे. भारतीय स्वांतत्र्यलढयात आदिवासीचा सुवर्णअक्षरानी लिहून ठेवावा असा गौरवशाली इतिहास आहे. आदिवासी क्रांतीकारकांचा उपेक्षित इतिहास समाजासमोर मांडण्याचे कार्य आदिवासी लेखकांनी केले आहे. मराठी वाङ्मयात आदिवासी साहित्याने मोलाचे असे स्थान निर्माण केलेले आहे. भारतीय स्वांतत्र्यलढयात अनेक वीर पुरुष, वीर स्त्रिया, क्रांतिकारक पुरुष, संत आणि आदिवासी समाज बांधवांचे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील योगदान हे समाजबांधवांसाठी महत्वाचे आहे. इस्लामच्या आक्रमणाविरुद्ध लढताना राणी दुर्गावतीपासून ते पुंजा भिल्लापर्यंत अनेक आदिवासी शूरवीरांनी आपल्या प्राणाचे बलिदानही दिले. आदिवासींनी जे संघर्ष केले, त्या संघर्षामध्ये आदिवासी वीरांनी या संघर्षात आपल्या प्राणाची आहुती दिली आहे. शुरवीर आदिवासीच्या रक्ताने लिहिलेल्या या इतिहासाची तेजस्वी पाने मात्र भारतीय इतिहासात उपेक्षित राहिली. आदिवासी स्त्रियांनीही रणभूमीवर आपले कर्तृत्व गाजवले आहे. अशीच एक आदिवासी उपेक्षित विरंगणा राणी झलकारीचे उपेक्षित व्यक्तिमत्व या लेखात मांडले आहे.

लेखक मारोती उईके यांनी 'इतिहासात गाडलेले आदिवासी क्रांतिकारक' या पुस्तकात झलकारीबाईची व्यक्तिरेखा चित्रित केली आहे. २२ नोव्हेंबर १८३० रोजी वीरांगना झलकारीचा जन्म झाला. आदिवासी कोरी समाजात जन्म झालेल्या या वीरांगनेने १८५७ चे रण गाजविले. झांसीजवळ बालाजी मार्गावर असलेल्या भोजला हे तिचे जन्मगाव होय. मूलचंद नावाच्या सर्वसाधारण कष्टकऱ्याची झलकारी ही एकुलती एक मुलगी. झलकारी ही उठावदार बांध्याची, घारे डोळे, सरळ नाक आणि करारी व्यक्तिमत्त्वाची. बालपणापासूनच धाडसी वृत्तीची ! देशरक्षणासाठी सैनिक होण्याचे तिचे स्वप्न होते.

१८५७ च्या युद्धात राष्ट्रीय भावनेने प्रेरित होऊन ज्या झलकारीने आपल्या प्राणाची आहुती दिली. ती आदिवासी कोरी समाजातील झलकारी मात्र ऐतिहासिकदृष्ट्या उपेक्षित राहिली. जे रणमर्द रणात मेले, ज्या रणमर्दिन्यांनी रणात प्राणाच्या आहुत्या दिल्या त्यांचा इतिहास जाणीवपूर्ण काळ्या कभिन्न कोठडीत कोंबून ठेवला. इंग्रजांनी देशात शिक्षणप्रसार केला आणि बहुजन समाजात इतिहास संशोधक निर्माण झाले. त्याचाच परिपाक म्हणून झलकारीने इतिहासात पुनर्जन्म घेतला. झलकारी बारा वर्षाची असतानाच कुऱ्हाड घेऊन इंधन गोळा करण्यासाठी जंगलात गेली. इंधन जमा करत असताना एक चित्ता आक्रमकरीत्या तिच्या दिशेने धावून आला. झलकारीने न घाबरता, तेवढ्याच आक्रमकतेने त्या चित्त्यावर कुऱ्हाडीं सपासप वार केले. वार करताना तिच्या हातून कुऱ्हाड निसटली तरीही न घाबरता झलकारीने त्या चित्त्याशी मल्लयुद्ध केले. त्या चित्त्याला जबड्यातून फाडत नेले. चित्त्याचा तेथेच अंत झाला. जेव्हा झलकारी घरी परतली तेव्हा तिचे आईवडिल तिला बघून घाबरले, तेव्हा झलकारीने झालेल्या घटनेची इत्यंभूत माहिती दिली. झलकारीच्या साहसाची कथा सर्वत्र पसरली. झासी शहरात राहणारा पुरन कोरी या सैनिकास झलकारीची साहसी कथा पटली.

त्यामुळे तिला पाहणे व तिच्याविषयीची अधिक माहिती जाणून घेण्याची जिज्ञासा पुरनच्या मनात जागली. तो झासी संस्थानात शिपाई असल्याने मल्लखांब, कुस्ती, बंदूक चालविणे, दांडपट्टा, तलवार चालविणे इ. गोषीत प्रवीण होता. परण कोरीने वलकारीच्या मामाची कथा त्याच्या आईला ,ऐकविली. आजूबाजूच्या खेड्यातील लोकांच्या मध्यस्थीने झलकारीशी विवाह करण्याची इच्छा प्रकट केली. झलकारीच्या आई-वडिलांनी राजीखुशीने या विवाहास मान्यता दिली. विवाहानंतर गृहिणीसारखे जीवन जगण्यापेक्षा, मातृभूमीसाठी काहीतरी करून मरावे अशी तिची मनोमन इच्छा होती. त्यामुळे पतीच्या सहकार्याने युद्धकलेत अधिकाधिक प्रगल्भ होऊन झासी सैन्यात भरती होण्याची इच्छा तिने सासरकडील मंडळींना बोलून दाखविली. सुनेवर पराकोटीचा गर्व असलेल्या सासऱ्यांनी तिला चुटकीसरशी परवानगी दिली. तिचे पती पुरन कोरी हे उत्कृष्ट योद्धा असल्याने सर्वप्रथम त्यांनाच आपला गुरू मानून तिने युद्धकला हस्तगत केली. उरला प्रश्न झासी

सैन्यातील प्रवेशाचा. सन १८४३ ला गंगाधर राव यांना झासी संस्थान मिळाले. राणी लक्ष्मीचे पोटी पुत्र होत नसल्याने गंगाधररावांनी दामोदरराव यास दत्तक घेतले. लगेचच गंगाधररावांचा मृत्यू झाला. गंगाधररावांच्या मृत्यूने झासीचे संस्थान लक्ष्मीबाईने हाती घेतले. संस्थान एका बाईच्या हाती आल्याने इंग्रजांनी हळूहळू पाय पसरविणे सुरू केले. सन १८५३ मध्ये गंगाधररावांचा झालेला अकस्मात मृत्यू म्हणजे इंग्रजांना पर्वणीच ठरून गेला. त्यांनी दामोदररावांचे दत्तक विधान नामंजूर ठरवून झासी खाली करण्याच्या हालचाली सुरू केल्या.

१८५४ मध्ये भारतात गव्हर्नर जनरल म्हणून आलेल्या लॉर्ड डलहौसीने एका पाठोपाठ एक अशी संस्थाने खालसा करायला सुरुवात केली. मेरठ, नागपूर. ग्वाल्हेर, कानपूर, हैद्राबाद अशी एकामागून एक संस्थाने लॉर्ड डलहौसीने खालसा केली. एलीस आणि माल्कम या इंग्रज अधिकाऱ्यांनी ही संस्थाने खालसा करण्यात महत्त्वाचा हातभार लावला. राणी लक्ष्मीचे राज्य कायदेशीरदृष्ट्या अस्ताला गेले. हातचे राज्य गेल्याने राणी पुरती नाराज झाली. झासीचा कारभार तूर्तास तिच्याच हाती असल्याने स्वतःच्या रक्षणासाठी तिने महिला सैन्य उभे करण्यास इंग्रजांची परवानगी घेतली. बारीशन, मोतीबाई, जूही, सुंदर, मुदरी, काशिबाई आणि झलकारी यांच्या नेतृत्वात फौजफाटा उभा केला. १० मे १८५७ ला मेरठ छावणीत युद्धाची ठिणगी पडली. राणी लक्ष्मीबाईंचा सल्लागार याने युद्धात भाग घेण्याचा सल्ला दिला. ६ जून १८५७ ला राणी लक्ष्मीने युद्धात अप्रत्यक्षपणे उतरण्याचा निर्णय घेतला. मात्र मेजर ह्यूसनचा राणीवर विश्वासच नव्हता. त्याने झासी काबीज करून विद्रोह दडपण्याचा प्रयत्न केला. १

झलकारी ही राणीची खास रक्षक होती. त्याचप्रमाणे तिची काया शरीरयष्टी हुबेहुब राणी लक्ष्मीसारखीच होती. झलकारी साक्षात राणी लक्ष्मीबाई वाटत असल्याने राणीचा सल्लागार नाना भोपटकर याने छुप्या मार्गाने राणीला पळून जाण्याचा सल्ला दिला. राणीने ती कृतीत उतरवून आपल्या जागी झलकारीला उभे केले आणि राणी छुप्या मार्गाने पळाली. राणी पळताच स्वतःच झलकारीने राणी लक्ष्मीबाई म्हणून घोषित करून इंग्रजांचा संहार करण्यास प्रत्यक्ष युद्धात उतरली. इंग्रजांना थोपवून धरण्याचे महत्त्वपूर्ण काम झलकारीने केले. इंग्रजांशी लढताना झलकारीचे पती शहीद झाले. ही दुःखद बातमी झलकारीच्या कानावर पडली, परंतु भावविवश न होता एखाद्या घायाळ सिंहिणीसारखी इंग्रजांवर तुटून पडली. अचानक एक सनसनाटी गोळी झलकारीच्या छातीत घुसली. झलकारी घायाळ होऊन लढतच राहिली. एका मागून एक अशा अनेक गोळया तिच्या शरीरात सोडल्या. ४ जून १८५८ ला झलकारीला एखाद्या सिंहासारखे वीरमरण आले, परंतु मेजर ह्यूसन तिला राणी लक्ष्मीबाईच समजत होता. झलकारीची बहादुरी आणि निर्भयता बघून मेजर ह्यूसन म्हणाला, "अर्थात भारतातल्या फक्त १% मुली जरी भारतीय स्वातंत्र्यासाठी दिवाण्या झाल्या असत्या, तर इंग्रजांना केव्हाच भारत सोडून जावे लागले असते.२

१८५७ च्या राष्ट्रीय भावनेतून लढणारी वीरांगना झलकारी देवी ही एकमेवच असावी. झलकारीच्या रणमर्दानीचा फायदा उठवून तिचा इतिहास राणी लक्ष्मीच्या नावे नोंदला गेला. भा. मा. देशमुख यांनी असे म्हटले आहे की, "राणी तटावरून घोडा उडविणे तर दूरच, पण तिला घोड्यावर बसविण्यासाठीही साथीदार मदत करीत होते. झासीवालीच्या चारित्र्याबद्दलचे पुरावे भटांनी नष्ट केले असले, तरी तिचे चारित्र्य अनेकांना संशयास्पद वाटते. म्हणून जाणकार मराठा आपल्या कर्तबगार मुलीला 'मर्दानी झासीवाली' म्हणू देत नाही. "3 अशा प्रकारे वीरांगना झलकारीचा इतिहास जाणीवपूर्वक लपवून तेथे लक्ष्मीबाईचा इतिहास पुढे आणला. ज्या ठिकाणी झलकारी लढली, लढता लढता वीरगती प्राप्त झाली तेथे ब्राह्मणांनी आदिवासी स्त्रिला लपवून ठेवून तिच्या नावावरचा इतिहास लक्ष्मीबाईच्या नावे लिहिला.

**संदर्भग्रंथ सूची**

१) ' इतिहासात गाडलेले आदिवासी क्रांतीकारक ' उईके मारोती, उलगुलान प्रकाशन, वर्धा, प्रथमावृत्ती मे २०११.पृष्ट क्र.५
२) तत्रैव पृ. क्र. ६-१२
३) तत्रैव पृ. क्र. ७
४) 'आदिवासी वीरपुरुष' गारे (डॉ) गोविंद श्रीविद्या प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती 1986. महाराष्ट्रीतील आदिवासी मराठी साहित्य : एक शोध ' , गावित (डॉ) माहेश्वरी.

# JOURNAL OF RESEARCH AND DEVELOPMENT

**A MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL LEVEL REFEREED JOURNAL**

**ISSN: 2230- 9578**

**IMPACT FACTOR: 7.265**


## Publication Certificate

*This certificate is hereby awarded to Prof/Dr./Mrs./* Kunda Balasaheb Kavade.[Marathi Dept.] *in recognition of the contribution of paper/article titled* भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील उपेक्षित विरंगना: राणी झलकारी. *published after blind peer reviewed and editorial process in this journal. The editor wishes him/her a resplendent future.*

Details of published article /paper as under:

**Volume:** 16 **Issue:** 1

**Month:** 31 / 01 /2024

*Journal of Research and Development*
*A Multidisciplinary International Level*
*Refereed Journal*
*ISSN-2230-9578.*

**Dr. R. V. Bhole**
**Editor**
**Journal of Research and Development**
**ISSN No-2230-9578**
**Jalgaon**

विशेष अंक
मार्च 2024

ISSN : 0974-3065

# इतिहास दर्पण
# ITIHAS DARPAN

कलियुगाब्द ५१२५, विक्रम संवत् २०८०
इसवी सन् २०२३

**Indian Council of Historical Research Sponsored Two Day National Conference on Contribution of Marathwada in the Hyderabad Freedom Struggle Organized by Indraraj College, Sillod 1 & 2 March 2024**

अखिल भारतीय इतिहास संकलन योजना की शोध पत्रिका
आपटे भवन, केशव कुंज, झंडेवाला, नई दिल्ली - ११००५५
RESEARCH JOURNAL OF AKHIL BHARTIYA ITIHAS SANKALAN YOJANA
Apte Bhawan, Keshav Kunj, Jhandewala, New Delhi - 110055

| | | | |
|---|---|---|---|
| ५९ | उस्मानाबाद व लातूर जिल्हयांतील निजामी राजवटीबद्दल जनतेतील असंतोष एक अभ्यास | अनिल तानाजी जाधवर | ३२१-३२९ |
| ६० | मराठवाडा मुक्तिसंग्रामातील साहित्य लेखन | डॉ. रामेश्वर ज. चाटे | ३३०-३३४ |
| ६१ | स्वामी रामानंद तीर्थ यांचे शैक्षणिक कार्य | कल्पना अंबादास गिरे | ३३५-३३९ |
| ६२ | हैदराबाद मुक्तीसंग्रामातील उपेक्षित हुतात्मा : पत्रकार शोएब उल्ला खान | शेख इरफान शेख अय्युब<br>डॉ. टी. आर. पाटील | ३४०-३४६ |
| ६३ | हैद्राबाद मुक्तीसंग्रामातील स्त्रियांचा सहभाग त्यांचे कार्य आणि योगदान | तेजस्विनी रामदास तारु | ३४७-३५९ |
| ६४ | स्वा.सै. उत्तमराव मखाजी देसले यांचा हैदराबाद मुक्ती संग्रामात सहभाग | डॉ. जे. डी. गोपाळ | ३६०-३६७ |
| ६५ | झुंजार सेनानी स्वामी रामानंद तीर्थ | सीमा भाऊसाहेब शेलार<br>डॉ. किशोरकुमार गव्हाणे | ३६८-३७४ |
| ६६ | हैद्राबाद स्वातंत्र चळवळीत पुसद परिसरातील स्वातंत्र सैनिकांचे योगदान एक ऐतिहासिक अध्ययन | डॉ. एन.आर. वर्मा | ३७५-३८० |
| ६७ | मराठवाडा प्रदेशाची सांस्कृतिक जडणघडण | डॉ. सतीश खरात | ३८१-३८७ |
| ६८ | हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामातील आर्य समाजाची भूमिका | डॉ. केशव अंबादास लहाने | ३८८-३९० |
| ६९ | हैद्राबाद मुक्ती संग्रामातील महिला समाज सुधारकांचे योगदान | श्री. सिताराम आवडजी अनाप | ३९१-३९५ |
| ७० | स्वामी रामानंद तिर्थ आणि वंदे मातरम चळवळ | डॉ. जाधवर बी.डी | ३९६-४०१ |
| ७१ | हैदराबाद मुक्तिसंग्रामात मराठवाड्याचे योगदान | डॉ. गंगणे अमोल उत्तमराव | ४०२-४०७ |
| ७२ | हैदराबाद संस्थानातील विविध प्रादेशिक संघटना व त्यांचे कार्य | डॉ. धीरजकुमार नजान | ४०८-४१३ |
| ७३ | हैदराबाद मुक्ती संग्रामात मराठवाड्यातील व्रतपत्रांचे कार्य: एक अभ्यास विशेष संदर्भ मराठवाडा वृतपत्र | डॉ. विठ्ठल बाबुराव गुंडे | ४१४-४१८ |
| ७४ | मराठवाड्यातील आर्य समाजाचे कार्य; समाजशात्रीय अभ्यास | डॉ. कालिदास मारुती भांगे | ४१९-४२७ |
| ७५ | हैद्राबाद मुक्ती चळवळीत मराठवाड्यातील दगडाबाई शेळके यांचे योगदान | शितल उत्तमराव सावंत | ४२८-४३२ |
| ७६ | हैद्राबाद मुक्तिसंग्राम भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील अंतिम पर्व | डॉ. नरवाडे जे. एम. | ४३३-४३८ |
| ७७ | हैदराबाद मुक्तिसंग्रामात महिलांचा सहभाग | प्रा. विशाल रामदास रोकडे | ४३९-४४४ |
| ७८ | मराठवाडा मुक्तीसंग्राम अमृतमहोत्सव : महाराष्ट्र शासनाची भूमिका | बळीराम शेषेराव चव्हाण<br>डॉ. सुहास रंगनाथ मोराळे | ४४५-४५६ |
| ७९ | आर्य समाज असांप्रदायिक सत्याग्रह | डॉ. नम्रता दिलीप भोसले<br>एल. डी. मंडावत | ४५७-४६० |

# हैदराबाद मुक्तिसंग्रामात महिलांचा सहभाग

**प्रो. विशाल रामदास रोकडे**
सहायक प्राध्यापक, इतिहास विभाग,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
अळकुटी, ता. पारनेर जि. अहमदनगर
संपर्क ९९७०७१७१४८ :
ई : मेल-vish.unipune@gmail.com

**प्रास्ताविक :**

हैदराबाद हे भारतातील सर्वात मोठे संस्थान होते आणि दोन शतकांहून अधिक काळ या संस्थानावर निजामाचे राज्य होते . राज्यात हिंदू, मुस्लिम आणि ख्रिश्चनांचा समावेश असलेल्या विविध लोकसंख्येचे घर होते आणि हैदराबाद, वारंगल, मेडक आणि नलगोंडा या चार जिल्ह्यांमध्ये विभागले गेले होतेहैदराबादचा निजाम ., मीर उस्मान अली खान, एक श्रीमंत आणि शक्तिशाली शासक होता ज्याने राज्यावर व्यापक अधिकारांचा उपभोग घेतला होता, ज्यात स्वतःची नाणी पाडण्याचा आणि स्वतंत्र सैन्य राखण्याचा अधिकार होता. इ.स.१९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, भारत सरकारने नव्याने स्थापन झालेल्या भारतीय प्रजासत्ताकमध्ये संस्थानांचे एकत्रीकरण करण्याची प्रक्रिया सुरू केलीतथापि ., हैदराबादच्या निजामाने राज्यातील मुस्लिम लोकसंख्येच्या संरक्षणाबद्दल चिंतेचे कारण देऊन भारतात प्रवेश करण्यास नकार दिला . यामुळे भारत सरकार आणि निजाम यांच्यात संघर्ष निर्माण झाला, पूर्वीच्या लोकांनी नंतरच्यावर फुटीरतावादी प्रवृत्तींना आश्रय दिल्याचा आरोप केला. तत्कालीन ब्रिटिश भारतात हैदराबाद संस्थान होतेत्यात . तेलंगणा, मराठवाडा, उत्तर कर्नाटक आणि विदर्भ या आधुनिक राज्यांचा समावेश होता . निजामइ.स.१७२४ ते इ.स.१९४८ पर्यंत हैदराबाद राज्याचा कारभार पाहत होता . स्वातंत्र्यसैनिकांच्या प्रदीर्घ हैदराबाद मुक्तिसंग्रामानंतर निजामाच्या कारकिर्दीविरुद्ध पोलिस कारवाईनंतर, हैदराबाद इ.स.१९४८ मध्ये भारतात विलीन झाले. दि.१७ सप्टेंबर १९४८ ची घटना भारताच्या स्वातंत्र्याच्या इतिहासाला कलाटणी देणारी होती . या प्रदेशाला स्वतंत्र राष्ट्र हैदराबादच्या लोकांनी स्थापन करण्याच्या निजामाच्या प्रयत्नांना पराभूत करण्याबरोबरच हा प्रांत भारताच्या संघराज्यात विलीन करण्याचा निर्णय घेतला.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी निजामाच्या संस्थानातील लोकांना दडपशाही आणि दडपशाहीचा सामना करावा लागला, जेव्हा उर्वरित भारत स्वातंत्र्य दिन साजरा करत होता, तेव्हा हैदराबाद राज्य भारताशी एकीकरण करण्याच्या आवाहनासाठीनिजाम .

आणि त्याच्या वैयक्तिक सैन्याच्या, 'रझाकार' च्या हिंसाचाराला न जुमानता हैदराबादचे लोक त्यांच्या स्वातंत्र्याच्या उत्कटतेवर कायम राहिले. तत्कालीन गृहमंत्री आणि 'लोहपुरुष' सरदार वल्लभभाई पटेल यांनी केलेल्या धाडसी कृतीमुळे निजामाला भारतीय संघराज्यात सामील होण्यास भाग पाडले गेले, की ज्यांनी पोलिस कारवाईचे आदेश दिले .हि घटना दि .१७ सप्टेंबर १९४८ रोजी घडली' .ऑपरेशन पोलो' हे या ऑपरेशनचे नाव होतेच्या भारत ब्रिटिशां . वर्चस्वातून मुक्त झाला, तेव्हा हैदराबादच्या लोकांना त्यांच्या स्वातंत्र्यासाठी १३ महिने आणि दोन दिवस लढावे लागले निजामाला . त्याचा कट राबविण्याची परवानगी दिली असती तर भारताचा वर्तमान नकाशा अस्तित्वात नसता असे दिसून येते. महाराष्ट्रात हा हैदराबाद मुक्तिसंग्राम 'मराठवाडा मुक्ती दिन' म्हणून साजरा केला जातोम्हणजेच ., मराठवाडा हा प्रदेश, जो आता महाराष्ट्राचा एक भाग आहे, इ .स.१९४८ मध्ये हैदराबाद संस्थानाचे विलीनीकरण झाल्यानंतर भारतात सामील झाला .यात जालना, नांदेड, औरंगाबाद, बीड, हिंगोली, लातूर, उस्मानाबाद आणि परभणी यापैकी काही आहे .म्हणूनच दरवर्षी १७ सप्टेंबर रोजी महाराष्ट्रात 'मराठवाडा मुक्ती दिन' मोठ्या उत्साहात साजरा केला जातो आहे.

**हैदराबाद मुक्तिसंग्रामात महिलांचा सहभाग:**

हैदराबाद संस्थानात स्त्रियांना अतिशय हीनतेची वागणूक दिली जात होती . बालविवाह, बालविधवा, अंधश्रद्धा, अज्ञान, निरक्षरता, दारिद्र्य, कुपोषण, राजकीय व सामाजिक जागृतीचा अभाव, पडदा पद्धती अशा अनेक रूढी परंपरांच्या विळख्यात-येथील स्त्रिया अडकलेल्या होत्याइस्लामी संस्कृती व . .परंपरेचा फार मोठा प्रभाव स्त्रियांवर होता महिलांनी तरीही हैदराबाद मुक्ती लढ्यात मोलाचे योगदान दिल्याचे दिसून येते.

हैदराबाद मुक्तिसंग्रामातील महिलांच्या सहभागाचे दोन कालखंड करता येतील.

1) पहिला कालखंड – प्रारंभापासून ते इ.पर्यंत १९३८स .

२ – दुसरा कालखंड ( इ.स.१९३८ ते इ.स.१९४८ पर्यंत .

पहिल्या कालखंडात स्त्रियांनी ग्रंथालय चालविणे, राजकीय प्रचारातील पत्रके वाटणे, गणपती मेळ्यात भाग घेणे, सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग घेणे, चळवळीतील कार्यकर्त्यांना अन्न पुरविणे, चळवळीतील कार्यकर्त्यांची गृहिणी म्हणून घर सांभाळणे इत्यादी कामे केलेली दिसून येतातपहिल्या . कालखंडातील महिलांचा सहभाग हा .सामाजिक व संस्कृती स्वरूपाचा होता पहिल्यापेक्षा दुसरा कालखंडातील महिलांचा सहभाग अधिक निर्णायक ठरला .इ १९३८स . या दुसऱ्या कालखंडात ज्या १९४९ते महिलांनी सहभाग नोंदवला त्यात आशाताई वाघमारे, सुशीलाताई दिवाण, पानकुंवर कोटेचा, सुलोचनाबाई बोधनकर, कावेरीबाई, गोदावरीबाई, लताबाई, उषा पांगुरीबाई, गिताबाई चारठाणकर, प्रतिभाताई वैशंपायन,

दगडाबाई शेळके, तारा परांजपे, करुणाबेन चौधरी, शकुंतला साले इत्यादी महिलांचा सहभाग होतात्यांच्या मुक्ती लढ्यातील . .सहभागाचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे

भूमिगत राहून अनेक महिलांनी आपले नाव प्रकाशात न येऊ देता मुक्तीलढ्याचे संघटन केलेले दिसून येते. दगडाबाई शेळके ह्या महिलेने हातात चार तास रायफल घेऊन रझाकारांशी झुंज दिली. कुसुमताई जोशी यांनी पत्रके वाटून आपला सहभाग नोंदविला तर शांताबाई काटे यांनी स्वदेशी व खादीचा प्रसार केला. स्वामी रामानंद तीर्थ तुरुंगात असताना त्यांच्या भगिनी कमलाबाई यांनी लढ्याची माहिती संकलित केली. चर्चा, लेखन, साहित्य परिषद इत्यादी माध्यमातून महिलांनी कार्यकर्त्यांचे बळ वाढविलेले दिसून येते. हैदराबाद स्वातंत्र्यसंग्रामात महिलांनी पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून शत्रूशी दोन हात केलेले दिसून येतात. स्टेट काँग्रेसच्या आदेशानुसार त्यांनी झेंडा सत्याग्रह व जंगल सत्याग्रह केला. यावेळी जवळपास दीड हजार महिलांनी सहभाग घेतला होता. सूर्यापेठला रझाकारांनी विद्यार्थ्यांवरती लाठी हल्ला केला त्याच्या निषेधार्थ ऑगस्ट १९४७ मध्ये निजाम कॉलेज पासून निघालेल्या मोर्चात गवळीगुड्याच्या विवेकवर्धिनीतील ५० मुलींनी भाग घेतला. या मोर्चावर रजाकारांनी केलेल्या लाठी हल्ल्यात कालींदा देशपांडे जखमी झाल्या होत्या. विमलाबाई मेलकोटे व सीताबाई नांदापूरकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या सत्याग्रहात उषा पांगरेकर यांनी एक वर्षाच्या मुलासह सहभाग घेतला म्हणून त्यांना आठ महिन्याची शिक्षा झाली. तारा परांजपे व मनुबाई कुलकर्णी यांनी स्वातंत्र्य आंदोलनात कार्य केले. आशाबाई वाघमारे यांनी औरंगाबाद मधील गुलमंडीवर तर ईट येथे काकीसाहेब देशमुख यांनी तिरंगा फडकवत आंदोलन केले.

महाराष्ट्र परिषदेच्या अधिवेशनाप्रमाणे मराठवाड्यात महिलांची नांदेड, औरंगाबाद, सेलू व लातूर येथे मेळावे झाले. १ ऑक्टोबर १९४७ मध्ये औरंगाबाद येथे १०० महिलांनी सरकारच्या विरोधात घोषणा देऊन सत्याग्रह केला. बीड, परभणी, लातूर व उस्मानाबाद येथे अशाच स्वरूपाचे सत्याग्रह झालेले दिसून येतात. कल्हाळी येथील दलित महिलांनी रझाकारांशी कडवी झुंज दिली. रझाकार आणि पोलीस यांच्या संयुक्त अत्याचाराला या ठिकाणी परिसिमा राहिली नव्हती. कासिम रजवीचा भाऊ तय्यब, भोतकूरचा दाढीवाला आसीम, सिकंदराबादचा मोहम्मद हाजी एका खेड्यात आले असता दुपारी चहाकरिता दूध मिळेना तेंव्हा त्या खेड्याच्या पाटलाला त्यांनी उन्मतपणे हुकूम केला! ' गाई म्हशी दूध देत नाहीत तर तुंम्ही तुमच्या बायकांचे दूध ताबडतोब घेऊन या हमको चाय पीना है!' असे म्हटलेले दिसून येते. महाराष्ट्र परिषद चालू असताना संस्थानातील महिलांनी लातूर महिला संमेलन १९३८, औरंगाबाद- १९४३, सेलू- १९४५, लातूर- १९४६ मध्ये महिला परिषद भरून फार मोठी महिला शक्ती संघटित केलेली दिसून येते. तुंगाबाई बेळुर्गीकर तुरुंगात गुप्तपणे गुप्तपत्र वाटण्याचे कार्य करीत होत्या.

राजकुंवर विजयेंद्र काबरा जीव धोक्यात घालून स्वातंत्र्य सैनिकाला मदत करीत तर नांदेडच्या ताराबाई परांजपे व पद्माकर लाढकर यांनी भुईवालीचा वेश धारण करून सुलतान बाजारातील छोटा खटला गल्लीमधील स. कृ. वैशंपायनच्या घरातील मशीन सायक्लोस्टाईलने शिताफिने पळविले व जाताना पोलीस पहारेकऱ्यांना 'निकडपू सल्लागा उंडणी' (तुझा वंश वाढूदे) असा तोंडभरून आशीर्वाद दिला. आशाबाई वाघमारे पतीच्या खांद्याला खांदा देऊन कार्य करत होत्या. एकदा तर त्यांनी भिकारणीचा वेश घेऊन गुलमंडीच्या सत्याग्रहींना गुप्तपणे पत्रके वाटप केलेली आहेत. कॉम्रेड करुणा चौधरी यांचे धाडस असेच अभूतपूर्व होते. त्यांनी औरंगाबादच्या सुपारी हनुमान मंदिरापाशी काढलेला मोर्चा पोलिसांनी अडवला असताना सुद्धा तिरंगा झेंडा फडकविण्याचे धाडस दाखविले. पोलीस झेंडा हिसकवण्याचा प्रयत्न करीत होते परंतु प्रसंगावधान राखून करुणाबाईने मांडीवर झेंडा अंथरून त्यावर ज्योती नामक आपल्या कन्येला झोपविले व भाषण केले, यावेळी सर्व पोलीस आवाक होऊन भाषण ऐकत राहिले. गिताबाई विनायकराव चारठाणकर यादेखील निर्भय क्रांतिकारक भगिनी होत्या. त्या वाशिम कॅम्पच्या स्वातंत्र्य सैनिकांना बंदुका, पिस्तुले, रिव्होलवर काडतूसे व हातबॉम्ब पुरविण्याचे काम करत असत. छत्रपती शिवाजी महाराजांचा गनिमी कावा युद्धनीती ही येथील सर्वच स्त्री-पुरुषांच्या रक्तात भिनलेली होती असे दिसून येते.

नांदेड मुक्ती लढ्याचे केंद्र होते. या परिसरातील महिला पिछाडीस राहणे शक्यच नव्हते. सुलोचनाबाई, लताबाई, इंद्रायणी बोधनकर, शकुंतलाबाई साले, कृष्णाबाई रत्नाळीकर, रमाबाई गांजवे, सरस्वतीबाई सरदेशपांडे, तान्याबाई पाटील, चंद्रभागाबाई पाटील, गंगुबाई देव आदी सर्वजण धैर्यशाली स्वातंत्र्यसैनिक महिला होत्या. दगडाबाई शेळके ह्या तर अग्रभागी होत्या, झाशीच्या राणी प्रमाणे शौर्य त्यांच्या अंगी होते. टाकळी कोलते पिंपळगावी जन्मलेल्या या विरांगणेने स्टेट कॉंग्रेसची सदस्यत्व स्वीकारले व टाकळी कॅम्पच्या प्रमुख बनल्या. घोड्यावर बसून खांद्यावर बंदूक घेऊन या मुस्लिम वस्तीत निर्भयपणे पहारा देत होत्या. पोलीस कारवाईत कन्हेरगाव कॅम्पात त्या सक्रिय होत्या. अशाच अनेक चळवळीत व सत्याग्रहात त्यांचा पुढाकार असलेला दिसून येतो. म्हणूनच दगडाबाई शेळके यांना हैदराबादेच्या मुक्तिसंग्रामातील महिला योद्धा मानले जाते.

**समारोप :**

हैदराबाद राज्य ब्रिटिश राजवटीच्या अस्ताच्या वेळेपर्यंत टिकून असलेले भारतातील सर्वात मोठे स्वायत्त संस्थानिक राज्य होते . सध्याच्या तेलंगणा, मराठवाडा, उत्तर कर्नाटक, विदर्भाचा काही भाग या भारताच्या दक्षिण-मध्य भागात या संस्थानाची व्याप्ती होती. इ१ .स.७२४ पासून इ.स. १९४८ पर्यंत निजाम हैदराबाद राज्याचे संस्थानिक होते .इ.स.१९४७ मध्ये ब्रिटिशांनी

भारतीय स्वातंत्र्याचा कायदा पास केलाया . रोजी भारत १९४७ऑगस्ट १५कायद्यानुसार .ब्रिटिशांच्या राजकीय वर्चस्वातून मुक्त झाला .म्हणजेच भारताला स्वातंत्र्य मिळालेवरील कायद्यानुसार देशी राज्ये आणि संस्थानिकांनाही त्यांनी आपले राज्य भारतात की पाकिस्तानात विलीन करावयाचे की, स्वतंत्र राहावयाचे या बाबतीत स्वातंत्र्य दिलेले होते . त्यामुळे देशी राज्ये व संस्थाने भारतीय संघराज्यात कशी विलीन करून घ्यावयाची हा . भारत सरकारपुढे निमाण झालामोठा प्रश्न शेवटी भारत ाचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू आणि गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी बहुतेक संस्थाने भारतात विलीन करून घेतलीपरंतु हैदराबाद राज्याचा . सत्ताधिश निजाम मीर उस्मान अली खान याने ११ जून १९४७ रोजी आपले राज्य स्वतंत्र राहणार असल्याचे जाहीर केले .निजामाने आपले राज्य स्वतंत्र राहणार असल्याचे घोषित केल्यामुळे भारत सरकार आणि हैदराबाद राज्यातील जनतेपुढे मोठा पेच व प्रश्न निर्माण झालाहैदराबाद राज्याचा . सत्ताधिश मुसलमान होता ८८परंतु राज्यात . टक्के हिंदू, ११टक्के मुसलमान आणि १ टक्का इतर लोक होतेयाशिवा .य देशाच्या व दख्खनच्या मध्यभागी असलेले आणि देशात आकाराने दुसऱ्या क्रमांकाचे असलेले हैदराबाद राज्य स्वतंत्र राहणे राज्यातील जनतेच्याच नव्हे तर देशाच्याही हिताचे तसेच हैदराबाद राज्याच्या भारतातील विलीनीकरणाशिवाय भारताच्या स्वातंत्र्याला पूर्ण प्राप्त होणार नव्हते . त्यामुळे राज्यातील जनतेने हैदराबाद राज्याचे भारतीय संघराज्यात विलीनीकरण .करण्यासाठी सत्याग्रह व सशस्त्र आंदोलन केले स्वातंत्र्य सैनिकांच्या प्रदीर्घ हैदराबाद मुक्ति संग्रामाचा शेवट शेवटी १३ सप्टेंबर १९४८ रोजी भारत सरकारने हैदराबाद राज्यावर लष्करी कारवाई करून ते भारतीय संघराज्यात विलीन करून घेतलेहैदराबाद राज्याच्या . विलीनीकरणासाठी जनतेने जे सत्याग्रह व सशस्त्र आंदोलन केले, हेच आंदोलन भारतीय इतिहासात 'हैदराबादचा स्वतंत्र संग्राम-' या नावाने ओळखले जातेसंग्राम - हा स्वातंत्र . .भारतीय स्वातंत्र आंदोलनाचाच एक भाग होता या स्वातंत्र लढ्यात दलितांचाही सिंहाचा वाटा .आहे

हैदराबाद मुक्तिसंग्राम ही भारताच्या स्वातंत्र्योत्तर इतिहासातील एक महत्त्वाची घटना होती, कारण ती भारतातील रियासतशाही संपुष्टात आली आणि हैदराबादचे भारतीय संघराज्यात एकीकरण झालेहे . ऑपरेशन भारतासाठी लष्करी यश होते आणि त्यामुळे संस्थानांवर भारत सरकारचा अधिकार .प्रस्थापित करण्यात मदत झालीतथापि, ऑपरेशनमध्ये महत्त्वपूर्ण मानवतावादी खर्च देखील होता, कारण यामुळे हजारो लोकांचे विस्थापन झाले आणि अनेक लोकांचे प्राण गमवावे लागलेया ऑपरेशनमुळे . हैदराबादमधील मुस्लिम लोकसंख्येमध्ये मोठ्या प्रमाणावर नाराजी पसरली, ज्यांना असे वाटले की त्यांना भारत सरकारने अन्यायकारकपणे लक्ष्य केले आहे. शेवटी, हैदराबाद मुक्तिसंग्राम ही भारताच्या

स्वातंत्र्योत्तर इतिहासातील एक महत्त्वाची घटना होती, कारण ती भारतातील रियासतशाही संपुष्टात आली आणि हैदराबादचे भारतीय संघराज्यात एकीकरण झाले . संस्थानांवर भारत सरकारचा अधिकार प्रस्थापित करण्यासाठी हे ऑपरेशन केले गेले आणि यामुळे एकसंध आणिलोकशाही भारताचा पाया रचण्यात मदत झालीतथापि ., ऑपरेशनमध्ये महत्त्वपूर्ण मानवतावादी खर्च देखील होता आणि त्याचा वारसा हैदराबादमध्ये आजही जाणवत आहे. एकूणच या स्वातंत्र्यसंग्रामात समाजातील विविध घटकांनी आपले महत्वपूर्ण योगदान दिले त्यास महिलाही अपवाद राहिल्या नाहीतमहिलांनी . या संग्रामात अभूतपूर्व योगदान दिल्याचे दिसून .येते

**संदर्भ ग्रंथसूची :**


१. हैदराबादचा स्वातंत्र्यसंग्राम आणि मराठवाडा, भालेराव अनंत, मौज प्रकाशन मुंबई, डिसेंबर २०१२.

२. हैदराबाद स्वातंत्र्यसंग्राम, पोतदार वसंत, विद्याभारती प्रकाशन लातूर, २००६.

३. मराठवाड्याचा इतिहास, डॉ. करपे राजेश, चिन्मय प्रकाशन औरंगाबाद, जुलै २०१६.

४. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, डॉ. कठारे अनिल, विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगाबाद, जून २००९.

५. https://vishwakosh.marathi.gov.in/20186/